# नमुना उत्तरपत्रिका

प्रश्न १. 'वाडवळी' बोलीची व्याकरणिक वैशिष्ट्ये उदाहरणासह सांगा.

उत्तर–'वाडवळी' या शब्दाचा अर्थ– वाडीचे वळ, ज्यावर कृषीचे, शेतीवाडीचे, मातीचे, झाडांचे, पाना–फुलांचे संदर्भ, वळ उठलेले आहेत. वाडवळ हे व्यवसायवाचक नाम– त्यांची बोली वाडवळी – त्यातील सर्वनामविचार, क्रियापदविचार, विभक्तीवैशिष्ट्ये यांसारख्या व्याकरण्कि वैशिष्ट्यांची चर्चा अपेक्षित

**किंवा**

प्रश्न १. 'वाडवळी' लोकसंस्कृतीचा थोडक्यात परिचय करून द्या.

उत्तर– ख्रिस्ती धर्माशी संबंधित शब्दांचा पगडा, वाडवळी बोलीचे वेगळेपण, ख्रिस्ती समाजातील विविध बाबींचा प्रभाव, विविध पदार्थांचा वेगळेपणा, यांसह लोकसंस्कृतीच्या अनुषंगाने येणाऱ्या बाबींचे विवेचन अपेक्षित

प्रश्न २. 'कोपात' या कादंबरीचे भाषिक विशेष सांगा.

'कोपात' या कादंबरीमध्ये मातृभाषा म्हणून आलेली मराठी भाषा, वाडवळी बोलीतील अनेक शब्द, पोर्तुगीज शब्द, धार्मिक विधीतील, पाकशास्त्रातील शब्द, परकीय भाषेतील शब्द असे भाषिक विशेष येतात. त्यांचे विवेचन अभिप्रेत.

**किंवा**

प्रश्न २. 'कोपात' या कादंबरीच्या आधारे वसईतील बदलते समाजजीवन, संस्कृती यांचा परिचय करून द्या.

उत्तर–वसई वसईचा ख्रिस्ती समाज, संस्कृती भाषा यातील परिवर्तन सांगताना धर्म, भाषा, सहजीवन वसई परिसर, जुन्या वसई गावाची मानसिकता, काळवंडणारे वर्तमान, परागंदा होऊ लागलेली माणूसकी, महानगर बनताना नष्ट होऊ लागलेली संवेदनशीलता यांसारख्या बाबींमधून वसईच्या ख्रिस्ती समाजाच्या अंतर्बाह्य परिवर्तनाची चर्चा अभिप्रेत.

प्रश्न ३. तुम्हांस अभ्यासास लावलेल्या लोकगीतांच्या आधारे वाडवळी बोलीचे वेगळेपण सांगा.

उत्तर– उच्चारसौकर्य, उच्चारप्रक्रियेतील वेगळेपणा, पुनरावृत्ती, मिथकांचा वापर, प्रतिकात्मकता, परभाषेतील शब्द यांसारख्या मुद्द्यांमधून वेगळेपण अभिप्रेत.

**किंवा**

प्रश्न ३.तुम्हांस अभ्यासास लावलेल्या कथांच्या आधारे वाडवळी संस्कृती आणि बोली यांचा परिचय करून द्या.

उत्तर– सर्व कथा, त्यांचे लेखक, कथांमधून आलेली बोली, सण, उत्सव, कृषी संस्कृती, दोन पिढ्यांमधील वैचारिक भिन्नत्व, सर्वसामान्य माणूस, त्याची ससेहोलपट, समाजामध्ये दृष्टीस पडणारी माणूसकीया सर्वांचा विचार अपेक्षित.

**प्रश्न ४. टिपा लिहा.**

१. वाडवळी बोलीतील बोलीभेद
उत्तर– वाडवळीमध्ये पानमाळी वाडवळी आणि ख्रिस्ती वाडवळी असे सामाजिक भेद आहेत. तसेच वसई, केळवे– माहिम तसेच चिंचणी परिसरामध्ये बोलल्या जाणाऱ्या बोलीच्या विविध छटा दिसून येतात. या आधारे बोलीभेद सांगणे आवश्यक.

**किंवा**

**१.** वाडवळी उच्चारप्रक्रिया
उत्तर– उच्चारप्रक्रियेत 'ळ' चा 'ड', 'स' चा 'ह', 'ह','झ' ऐवजी य , 'अ' चा 'व', 'च' चा 'स' होतो... यास्वरूपाचे विवेचन अपेक्षित.

**२.** 'कोपात'मधील मन्या
उत्तर– मन्या– त्याची जडणघडण– मन्याचे कुटुंब–मन्याचे परदेशातील अनुभव, त्याचे विविध विचार या सर्वांमधून चित्रित झालेले मन्याचे भावविश्व या बाबींची चर्चा अपेक्षित.

**किंवा**

२. मन्याचे स्त्रीविषयक विचार
उत्तर– मन्याला सौदी अरेबियातील पाहिलेल्या बाबींनी त्याला पडलेले मूलभूत प्रश्न– भारतीय स्त्री – सौदी अरेबियातील स्त्री – असे स्त्रीविषयक विचार अभिप्रेत

३. 'नट नटी आल्यात...' या कथेतील विनोद'
उत्तर– 'नट नटी आल्यात...' ही कथा–लेखक परिचय– वसईतील पाली धर्मग्रामाचा सण– समाजातील लोकांचा नट–नट्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन–धार्मिक विधींकडे होणारे दुर्लक्ष– अस्सल बालीभाषा–विनोदी शैली आदि बाबी अभिप्रेत.

**किंवा**

**३.** 'शीसे से पाखुरले' लोकगीताचे विशेष
उत्तर– भारतीय समाज, समाजातील स्त्रीविषयक दृष्टिकोन, मिथक, भाषा यांआधारे स्पष्ट करणे अपेक्षित.

**प्रश्न ५. खाली दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही पाच)**

०१.ख्रिस्ती वाडवळी बोलीवर कोणकोणत्या भाषांचा प्रभाव अधिक आहे?

उत्तर –ख्रिस्ती वाडवळी बोलीवर गुजराती आणि कोकणी या भाषांचा प्रभाव अधिक आहे.

०२.वाडवळी बोली कोणकोणत्या परिसरामध्ये बोलली जाते?

उत्तर –वाडवळी बोली डहाणू, पालघर, वसई या परिसरामध्ये बोलली जाते?

०३.महानुभवीय साहित्यातून आलेले वाडवळी बोलीमध्ये प्रचलित असलेले कोणतेही दोन शब्द सांगा.

उत्तर –महानुभवीय साहित्यातून आलेले वाडवळी बोलीमध्ये प्रचलित असलेले बिदी–रस्ता, उगवणे–मोकळे होणे, गुता उलगडणे, उंडा– गोळा, लाडू, कवाड–दार, निडळ–कपाळ, ठाए, ठाय–भोजनपात्रे...

०४.मन्याच्या सहचारिणीचे नाव आणि तिचे शिक्षण सांगा.

उत्तर –मन्याच्या सहचारिणीचे नाव जॉना आणि तिचे शिक्षण ग्रॅज्युएशन, बी.एड.

०५.'बाफात' म्हणजे काय?

उत्तर –बाफात हा एक पदार्थ असून ती संके बोंबील, वांगी, बटाटा व चिंचेचा कोळ घालून केलेली कढी असते.

०६.एक आणा न मिळाल्याचे दु:ख विसरण्यासाठी शाळेत जाताच मन्याने कोणती बातमी पसरवली?

उत्तर –एक आणा न मिळाल्याचे दु:ख विसरण्यासाठी शाळेत जाताच मन्याने 'होळीच्या नाक्यावर ॲक्सिडेट झालाय. घोड्यावरून एस.टी. गेली' ही बातमी पसरवली.

०७.'ताडा रे माडां'या अंगाई गीतामध्ये कोणकोणत्या गावांचे उल्लेख आले आहेत?

उत्तर –'ताडा रे माडां' या अंगाई गीतामध्ये माहिम, बोईसर, केळवे या गावांचे उल्लेख आले आहेत.

८. कवी रघुनाथ माधव पाटील यांचे टोपननाव सांगा.

उत्तर – कवी रघुनाथ माधव पाटील यांचे टोपननाव आरेम् .

९. 'समजावणी' हे कवितेत कोणी कोणाला समजावणी घातली आहे?

उत्तर –'समजावणी' हे कवितेत मुसळधार पडणाऱ्या पावसाला एका गृहिणीने समजावणी घातली आहे.